## ५ गोमंतक संग्रामदेवता

## सौ. सुधाताई जोशी ह्यांचा पोवाडा (शीघ्रकाव्य)

(गोव्याची रणरागिणी सौ. सुधाताई जोशींना मानाचा मुजरा!)

(चाल) पंचारती घेऊनी करीं। मुंबई नगरी। थांबले (थांबे) सत्वरी।
सुधाताईंचे स्वागत करण्यास।। ओघळती आनंदाश्रु नेत्रांस।
जयघोष भिडला जाऊन गगनास।।
सामान्य संसारी नारी। अशिक्षित जरी। धैर्याची भारी।
सोडुनियां पुत्र, पती, घरदार।। मनामधिं करुन घोर निर्धार।
गोव्याच्या मुक्तिसाठीं लढणार।।

(चाल-चंद्रकांत) फिरंगी महिषासुर मातला जुलुम करी फार।
गोमंतक-भू-स्वातंत्र्याचा करुनी अपहार।।
गोमंतक भू नंदनवन हें दक्षिण देशाचें।
भारतभूच्या कटिबंधातील रत्न मेखलेचें।।
(भारतभूच्या अंगावरचें लेणें हें साचें!)
नंदनवन उध्वस्त कराया दैत्य घुसुन बसला।
गोमंतक-भू-स्वातंत्र्यावर (प्रहार) घातला घोर घाला।।
आर्यसंस्कृति नष्ट कराया बांधियला चंग।
पवित्र देवालयें (देवस्थानें) तोडुनि केल्या मूर्ति भंग।।
आयाबहिणी (माताभगिनी) भ्रष्टविल्या किती नाहीं तया गणती।
अन्यायाचा कळस जाहला गोमंतक प्रांतीं।।
पीडित जनता आर्त स्वरानें प्रभुला आळविते।
"धाव कृपाळा, दीन दयाळा, रक्षीं आम्हांतें"।।
आळवसोनें प्रभुनें त्यांचा धांवा ऐकिला।
पाठविलें दुर्गेस पृथ्वीवर असुर मारण्याला।।
असुरांच्या जुलुमी राज्याची करावया माती।

अष्टभुजेनें मोर्चा वळविला गोमंतक प्रांतीं ॥
युद्धाचें कुरुक्षेत्र निवडिलें म्हापश्याची धरती ।
सुधाताई रूपें अवतरली दुर्गा मूर्तिमंती ॥
मारुतीच्या साक्षीनें लढाई झाली घनघोर ।
हिंसेसंगें लढे अहिंसा अजब चमत्कार ॥
पाशवी जुलुमी हिंसक सेना आली खवळोनी ।
अन्यायाचें तीक्ष्ण आपुलें खड्ग उगारोनी ॥
सूर्यप्रभेला गिळण्या धांवे आवेशें तिमिर ।
हास्यास्पद तो यत्न तयाचा निष्फळ ठरणार ॥
स्वातंत्र्यभावना गाडूं ।
दुर्गेस यमगृहीं धाडूं ।
सत्याग्रही वीरां दंडूं ।
अशा विचारें सुधाताईंना फिरंगी अटक करी ।
गोमंतक संग्राम देवता पडे कारागारीं ॥

(चाल) तुरुंगीत जरी कोंडली । नाहीं कचरली । सुधाताई भाळी । संकटें सारीं सहन करणार ॥ बनेना शत्रुपुढें लाचार । मूर्तिमंती निर्भयता साकार ॥

(चाल) निर्भयतेला तुरुंगाची मुळीं पर्वा न च ठावी ।
देह जरी कोंडला, विचारा कैदी कां व्हावी ॥
मुक्त विचारां तुरुंगामध्यें (कारागारीं) जो रोधूं बघतो ।
मूर्ख खरा तो निज मुष्टीनें पवन धरूं बघतो ॥
तुरुंगामध्यें एक सोशिला (भोगिला) करुणा निर्धार ।
अन्यायाला मान न माझी कधीही झुकणार ॥
शोषणाचें शस्त्र पराजितें अमोघ समयाला ।
अन्यायाचें हो उच्चाटण, न्याय विजयी ठरला ॥

पोर्तुगीज लोक लई (अति) दुष्ट । २०
मनोवृत्ति त्यांची फॅसिष्ट ।
परि त्यांना कळलें स्पष्ट ।
स्वतंत्रतेची वृत्ति न मरते अत्याचारानें ।
कठिण परिस्थितीमध्यें खरोखर उसळे जोमानें (जोरानें) ॥
जव्हारी न्यायालयासमोरी खटला उभा झाला ।
न्यायमूर्तीनं सुधाताईंना प्रश्न काय केला ॥
तुम्ही असुन महिला संसारी ।
कां मारतां लाथ संसारीं ।
पोरं बाळं यकुनि माघारीं ।
सुखी जीवाला दुःखामध्यें लोटुनि कां देतां ।
संसारें घेऊनि उडी; तुरुंगीं खितपत कां पडतां ॥
अभिमानासी डंख जाहला दिधलें उत्तर ।
देशहिताच्या पुढती व्यक्तिच्या तुच्छचि संसार ॥
पुत्र लगिन टाकुनी निघाला तानाजी वीर ।
रामदास प्रभु देशहितास्तव सोडिली घरदारा ॥
धर्मरक्षणा अहिल्याबाई झटे सदोदित ।
देशास्तव तनु त्यागुन लक्ष्मी साधी पुरुषार्थ ॥
ही परंपरा आम्हांला ।
नका दावुं लोभमोहाला ।
मी फसणार न तुम्हांला ।
इंगळ्या डसल्या न्यायमूर्तिच्या खोट्या दर्पाला ।
'बारा वर्षे तुरुंग!' शिक्षा न्यायाधीश वदला ॥
सुधाताईंनं शिक्षा ऐकली सस्मित वदनानं ।
भारतभूच्या परंपरेचं केलं रक्षण ॥
(आर्यस्त्रींच्या)

x x x

(पुढें पहा —

(सुधाताईंची)

चार वर्षांनी आली मुक्तीची उष:काल झाला। ३३

उषेमधुनी गोवा मुक्ति रवि येईल उदयाला॥

अश्रू अंसुनी प्रश्न ठरली प्रतिकूल समयाला।

उच्च स्वरानें सुधाताईंचा जन हो जय बोला॥

वीर मातुली, वीर पत्नी अनु धीर वीर बाला।

गोवा-रणरागिणी सुधेचा जन हो जय बोला॥

अशान्त लाभो वीर कन्यका सदा भारताला।

गाजो भारतवर्ष कीर्तिचा डंका जगतामधे॥

वीर कवन हें शीघ्र घेऊनी वसंतराय आला। (१)

सुधाताईंना अर्पी, सुधेचा जय हो जय बोला॥

(१) पाठभेद, वीर कवन हें शीघ्र रचुनियां शाहीर समयाला।

२ शीघ्र कवन हें घेऊनि शाहिर वसंतराय आला।

३ वीर कवन हें वसन्त शाहिर रचुनी समयाला।

प्रेमभरानें गातां गातां अश्रू गळले नयनाला॥

(स्फुट) त्यागाची जिथें भावना। यश तिथें जाणा। पटतसे मना।

शाहीर जाई यशास त्या भुलुन॥ यशोदेवीनें करतां स्तवन।

आपोआप आकार घेई कवन॥

मुम्बई, शनिवार, ६ जून १९५९ —— (वरील पोवाडा सौ. सुधाताईंच्या सत्काराचे वेळी १०,००० श्रोत्यांच्या समोर शिवाजी उद्यान, दादर येथे गायिला.)

(शीघ्र रचना)

सौ. सुधाताई! वेडेवांकडे चार शब्द गुंफून हें एक काव्य-काव्य कसलें? पद्यच म्हणा-रचून अशा धाराच्या मुजरा करण्यास मी उभा आहे. शाहिरी प्रांतातला माझा अनुभव अल्पसा! तरी आपल्या अलौकिक त्यागानें डोळे दिपून जाऊन त्या भावने-च्या ओघा बरोबर जे शब्द बाहेर आले तेच ह्या पोवाड्यांत गुंफले आहेत. त्यांत काव्यगुण किती आहेत इकडे न पाहतां आई जशी आपल्या मुलाच्या प्रत्येक कृतीकडे कौतुकानें पाहते, तशाच कौतुकानें आपण माझा मुजरा स्वीकारतां, आपले मंगल आशीर्वाद देऊन मला पुनीत कराल एवढीच अपेक्षा.

पुणे ४ ऑक्टोबर १९५९ — शाहीर वसंतराय